<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची सदुसष्टावी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भातकुली तालुका रुग्णालय व ट्रामाकेअर हॉस्पिटल बडनेरा (जि.अमरावती) येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ भरणेबाबत**

**(१) ११४० (२३-१२-२०१४). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली तालुका रुग्णालय व ट्रामा केअर हॉस्पिटल बडनेरा (जि.अमरावती) या दोन्ही हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या आरोग्य सेवा सुरु करणेसाठी अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,

(२) असल्यास, नियुक्ती करण्यात येणाऱ्या पदांची निर्मिती कोणत्या संवर्गातील करण्यात येईल व पदांची भरती कधी करण्यात येईल,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०८-२०१५) :** (१) व (२) शासन निर्णय दि. १३.०५.२०१४ अन्वये ग्रामीण रुग्णालय भातकुली येथे १३ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर इमारत अद्याप हस्तांतरीत झालेली नाही.

ट्रामा केअर सेंटर बडनेरा जि.अमरावती येथे शासन निर्णय दि. १३.३.२०११ अन्वये ३ पदांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ४ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथे विविध वर्गाची ६० पदे रिक्त असल्याबाबत**

**(२) १५५५ (२२-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथे विविध वर्गाची ६० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) सदर पदे रिक्त असल्याने रुग्णालयाच्या व्यवस्थापनेत खोळंबा निर्माण होवून रुग्ण व्यवस्थेवर विपरीत पिरणाम होत असल्याने पदांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०८-२०१५) :** (१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाकरीता वर्ग-१ ते वर्ग-४ ची ५८० पदे मंजूर असून त्यापैकी ४४१ पदे भरलेली असून १३९ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) वर्ग-१ ची १६ रिक्त पदे, वर्ग-२ ची ८ रिक्त पदे, वर्ग-३ ची ५२ रिक्त पदे व वर्ग-४ ची ६३ रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबई-अहमदनगर राष्ट्रीय मार्ग क्र. ८ वर वसई तालुक्याच्या (जि.पालघर) हद्दीत ३०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(३) १९०५ (२२-१२-२०१४). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-अहमदनगर राष्ट्रीय मार्ग क्र. ८ वर वसई तालुक्याच्या (जि.पालघर) हद्दीत ३०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ रोजी वा तदनंतर आजमितीस सातत्याने लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) तसेच मुंबई-अहमदनगर राष्ट्रीय मार्गावर सातत्याने होणारे अपघात तसेच या महामार्गाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात असलेली आदिवासी लोकसंख्या यांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने विनाविलंब वसई तालुक्याच्या हद्दीत मागणीप्रमाणे ३०० खाटांच्या सुसज्ज रुग्णालयास मंजूरी मिळून ते लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०८-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ०९ ऑगस्ट २०१२ रोजी वा तद्नंतर मुंबई अहमदाबाद महामार्गावर (जि.पालघर) वसई तालुक्याच्या हद्दीत २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय सुरु करणेबाबत लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक ०९ जुन, २०१४ अन्वये वसई येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. या रुग्णालयासाठी जागा उपलब्धतेसाठी जिल्हा शल्य चिकीत्सक, ठाणे यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मनोर येथे ग्रामीण रुग्णालयाचे २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन व ट्रामा केअर युनीटची स्थापना करण्यास शासन निर्णय दिनांक १७.१.२०१३ अन्वये मान्यता दिली आहे. ग्रामीण रुग्णालय, पालघरचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिली आहे. त्याशिवाय ३० खाटाचे ग्रामीण रुग्णालय, विरार, ५० खाटांची उपजिल्ल्हा रुग्णालय, कासा, १०० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, डहाणू, ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, तलासरी कार्यान्वित असल्याने महामार्गावरील अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार करण्यात येतात.

---

**वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट भागातील औद्योगिक कामगारांना ईएसआयसी (राज्य कामगार विमा योजना) ही योजना अद्याप पर्यंत लागू करण्यात आली नसल्याबाबत**

**(४) २७०१ (२३-१२-२०१४). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट भागातील औद्योगिक कामगारांना ईएसआयसी (राज्य कामगार विमा योजना) ही योजना अद्याप पर्यंत लागू करण्यात आली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत राज्य शासनाने चौकशी केली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व हिंगणघाट औद्योगिक कामगारांना ईएसआयसी (राज्य कामगार विमा योजना) ही योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) राज्य कामगार विमा योजना, हिंगणघाट येथील सेवा दवाखान्यातील पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्यामुळे सेवा दवाखान्यामार्फत जाम व वणी या क्षेत्रातील कामगारांना वैद्यकीय सेवा पुरविणे शक्य नसल्याने सदर नविन क्षेत्रामध्ये राज्य कामगार विमा योजना लागू करणे शक्य नाही.

राज्य कामगार विमा योजनेतील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असून रिक्त पदे भरण्यात आल्यानंतर हिंगणघाट तालुकयातील नविन क्षेत्रामध्ये राज्य कामगार विमा योजना लागू करण्याबाबत कार्यवाही करता येईल.
(४) सन २०१० मध्ये राज्य मंत्री मंडळाने संपूर्ण राज्य कामगार विमा योजना ही संपूर्ण योजना राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे नविन धोरणात्मक निर्णय होऊ शकले नाही.

---

**नागपूर मंडळातील आरोग्य विभागातंर्गत चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा या सहा जिल्हयात विविध विभागात तज्ञ वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५) ३०१९ (२३-१२-२०१४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मंडळातील आरोग्य विभागातंर्गत चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा या सहा जिल्हयात पाच जिल्हा रुग्णालये, दोन स्त्री रुग्णालये, तीन शंभर खाटांची उपजिल्हा रुग्णालये, दहा पन्नास खाटांची उपजिल्हा रुग्णालये, ५१ ग्रामीण रुग्णालये, २५१ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ हजार ६४३ उपकेंद्र मध्ये ३५३ विविध विभागाच्या तज्ञ वैदयकिय अधिका-यांची पदे मंजूर असून ४१४ वैदयकीय अधिका-यांची पदे रिक्त असल्याची धक्कादायक माहिती दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त असलेल्या वैदयकिय अधिका-यांच्या जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०८-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर मंडळात एकूण ५ जिल्हा रुग्णालये, २ स्त्री रुग्णालये, ३ उप जिल्हा रुग्णालये (१०० खाटा), १० उप जिल्हा रुग्णालय (५० खाटा), ५२ ग्रामीण रुग्णालये, २५१ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १६४३ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत.

सदर आरोग्य संस्थामध्ये वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ संवर्गाची २४१ पदे मंजूर असून १०० पदे भरलेली आहेत व १४१ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची १०६३ पदे मंजूर असून ८७० पदे भरलेली आहेत व १९३ पदे रिक्त आहेत. उक्त दोन्ही संवर्गातील भरलेल्या एकूण ९७० पदांमध्ये १२४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एमबीबीएस / बीएएमएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. तसेच ग्रामीण रुग्णालय व त्यावरील रुग्णालयांसाठी तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणक निश्चित केलेले आहे.

सद्य:स्थितीत राष्ट्रीय आरोग्य अंतर्गत आयपीएचएस योजनेखाली नागपूर मंडळात एकूण १२५ वैद्यकीय अधिकारी करार तत्वावर कार्यरत असून त्यात ९२ तज्ञ वैद्यकीय अधिकारी समाविष्ट आहेत.

(२) स्वतंत्र निवड मंडळामार्फत शिफारसप्राप्त उमेदवारांमधून एप्रिल-मे, २०१५ मध्ये ७४ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नागपूर परिमंडळात पदस्थापना देण्यात आल्या आहेत. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरणेबाबत**

**(६) ३७८४ (२३-१२-२०१४). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हामध्ये आरोग्य केंद्रामध्ये ५७ वैदयकिय अधिकारी पदे रिक्त आहेत त्यामुळे आरोग्य सुविधा अभावी रुग्णांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी सदरहू रिक्त पदे तातडीने भरुन वैदयकीय सेवा पुरवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०८-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात ७३ प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ आरोग्य पथके, ३ तालुका दवाखाने, १ जिल्हा प्रशिक्षण केंद्र व १२ तालुका आरोग्य अधिकारी येथे वैद्यकीय अधिकारी गट - अ संवर्गाची १६७ पदे मंजूर असून त्यापैकी ९४ स्थायी २० अस्थायी व ६ बंधपत्रीत अशी १२० पदे भरलेली असून ४७ पदे रिक्त आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) स्वतंत्र निवड मंडळामार्फत शिफारसप्राप्त उमेदवारांमधून एप्रिल-मे, २०१५ मध्ये १४ वैद्यकीय अधिकाऱ्यांना कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात पदस्थापना देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-मुलुंड येथील कामगार हॉस्पीटल मधील सोयीसुविधा**

**(७) ३९९८ (२३-१२-२०१४). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - मुलुंड येथील कामगार हॉस्पीटलवर शासनाने केंद्र शासनाची देखरेख असल्याचे सांगितले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार हॉस्पीटल ५० टक्के कर्मचारी नाही, ॲम्ब्युलन्स नाही, शव कक्ष नाही, ऑपरेशन थिएटरमध्ये पुरेशी सामुग्रीही नसल्यामुळे ४०० रुग्णांकरिता असलेल्या कामगार हॉस्पीटलमध्ये फक्त १०० रुग्ण दिसण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार हॉस्पीटलच्या सुविधांसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या किंवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०८-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजनेची अंमलबजावणी केंद्र व राज्य शासनाकडून केली जाते.

(२) अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड येथे ४३ टक्के पदे रिक्त आहेत. रुग्णालयातील ३ रुग्णवाहिका जुन्या होऊन निकामी झाल्याने हेल्पलाईन १०८ मार्फत शासकीय तसेच दरपत्रका मार्फत खाजगी रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येतात.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात शवकक्ष कार्यरत नसल्याने जवळच्या एम.टी. अग्रवाल महानगरपालिका रुग्णालयामध्ये पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच रुग्णालयातील ऑपरेशन थियेटरमध्ये दैनंदिन तसेच आपत्कालीन शस्त्रक्रियेकरीता आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध असून सन २०१४-१५ मध्ये ७८५ शस्त्रक्रिया, ४२१ प्रसुती व प्रतिदिन आंतर रुग्णांची संख्या ८४ आहे.

(३) राज्य कामगार विमा महामंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीवर १ वर्षाच्या कालावधीकरीता अंशकालीन विशेषज्ञांची व शासनामार्फत बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी व परिचारीकांची नियुक्ती करण्यात येते.

रिक्त पदे भरण्याबाबत कार्यावाही करण्यात येत आहे.

वैद्यकीय यंत्र व उपकरणे खरेदीसाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) सन २०१० मध्ये महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळाने संपूर्ण राज्य कामगार विमा ही संपूर्ण योजना राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे नवीन धोरणत्मक निर्णय होऊ शकला नाही.

---

### वाघोली (जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणीवाढ करणेबाबत

**(८) ४२१७ (२३-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (जि.पुणे) येथे पुणे या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शासकीय रुग्णसेवेवर अपुऱ्या कर्मचारी वर्गाअभावी ताण निर्माण होऊन परिसरातील रुग्णांना योग्य वेळेत उपचार मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणी वाढ करण्याची व कर्मचा-यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०८-२०१५) :** (१), (२) व (३) प्राथमिक आरोग्य केंद्र, वाघोली, ता.हवेली, जि.पुणे च्या कार्याक्षेत्रातील एकूण लोकसंख्या ९१८३१ इतकी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र वाघोलीकरीता १५ पदे मंजूर असून त्यापैकी १४ पदे भरलेली आहेत. सफाई कामगाराचे रिक्त असलेले १ पद भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**आरोग्य विभागात सुमारे ११ हजार अर्धवेळ स्त्री परिचर कार्यरत असल्याबाबत**

**(९) ६१७६ (०६-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आरोग्य विभागात सुमारे ११ हजार अर्धवेळ स्त्री परिचर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्धवेळ असूनही सकाळी ७ ते सायंकाळी ५ पर्यंत उपकेंद्रात थांबणे, सहाय्यक आरोग्यसेविका यांच्यासोबत फिरती करणे, प्रसुतीनंतरही स्वच्छता, उपकेंद्राची साफसफाई व देखभाल, लसीकरणासारख्या ६ राष्ट्रीय कार्यक्रमात पूर्ण सहभाग, कुटुंबकल्याण नियोजनाच्या शस्त्रक्रियेवेळी त्यानंतरची स्वच्छता करणे आदि कामे या स्त्री परिचर करतात, हे ही खरे आहे काय,

(३) स्त्री परिचरांच्या अंशकालीन स्त्री परिचर संघटनेने अर्धवेळ हा शब्दप्रयोग काढून टाकावा, मानधन १५ हजार करावे, शासकीय कर्मचा-यांना दर्जा द्यावा, चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून जिल्हा परिषदेत सामावून घ्यावे, गणवेश व ओळखपत्र द्यावे, या मागण्या शासन व लोकप्रतिनिधींकडे लेखी स्वरुपात केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्त्री परिचरांच्या मागण्यांवर शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा घेण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०८-२०१५) :** (१) राज्यात सार्वजनिक आरोग्य उपकेंद्रासाठी प्रत्येकी १ या प्रमाणे १०५८० अर्धवेळ स्त्री परिचर आहेत.

(२) ए.एन.एम.ला मदतनीस म्हणून अंशकालीन स्त्री परिचर यांनी अंशकालीन काम करणे अपेक्षित आहे.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधी यांनी स्त्री परिचर यांना किमान वेतन मासिक रु. १०,०००/- देण्याबाबतची मागणी केली आहे. सदर प्रस्तावाची शासन स्तरावर छाननी सुरु आहे.

---

**शिरगाव (ता.अंबरनाथ) येथील १९७४ मध्ये दिलेल्या जमिनीवर वनजमिनीचे आरक्षण टाकून नगरपालिकेने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(१०) ७०७७ (०४-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराजांचे शिलेदार नरवीर बाजीप्रभु देशपाडे यांच वंशज स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र देशपांडे यांना शिरगाव (ता.अंबरनाथ) येथील १९७४ मध्ये दिलेल्या जमिनीवर

वनजमिनीचे आरक्षण टाकून नगरपालिकेने अनधिकृत बांधकाम केले असल्याप्रकरणी तहसीलदार, बदलापूर यांचेकडे नागरीकांनी माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या आठवड्यात तक्रार केलेली आहे, हे खरे आहेकाय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास याप्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी कडक कारवाई करुन स्वातत्र्यसैनिकास न्याय मिळवून देण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.परंतु मौजे शिरगांव ता.अंबरनाथ येथील सर्व्हे नं ११०/३ येथील २.० हे आर स्वातंत्र सैनिक यांच्या जमिनीवर स्मशानभूमी बांधल्याबाबत तसेच सदर क्षेत्र वन असल्याबाबतची बातमी दैनिक लोकमत व सकाळ वृत्तपत्रांमध्ये दि. १६.१.२०१५ व दि. १७.१२०१५ रोजी छापून आलेली आहे.
(२) ग्रामपंचायत काळापासून या जागेचा वापर स्मशानभूमी म्हणून करण्यात येत आहे. पुढे कुळगांव बदलापूर नगरपरिषद अस्तित्वात आल्यानंतर स्मशानभूमी शेडचे व कंपाऊंड वॉलचे बांधकाम करण्यात आलेले आहे.
(३) सदर विषय दिनांक १८.३.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेसमोर ठेवून याप्रकरणी ठराव क्र. १६५ चा पारित करुन स्मशानभूमी स्थलांतरीत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. याबाबत संबंधितांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र.(St) ९०१/२०१५ दाखल केलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**अलिबाग व पेण तालुक्यातील (जि. रायगड) गावतलावांचे नुतनीकरण व खोली वाढविणेबाबत**

**(११) ७६९३ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग व पेण तालुक्यातील ग्रामीण भागातील गाव तलाव अनेक वर्षे नुतनीकरण, गाळ काढणे इत्यादी कामे न केल्याने पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास शासन गावतलावातील गाळ काढणे, खोली वाढविणे व नुतनीकरण करणे यासाठी विशेष निधी शासन उपलब्ध करणार आहे काय
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
गाळ काढण्याचे काम लोकसहभागातून होणे अपेक्षित आहे. या कामासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषदे अंतर्गत निधी उपलब्धतेनुसार गाव तलावांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

---

**घनसावंगी तालुक्यातील (जि.जालना) रामगव्हाण पाझर तलावाच्या मावेजाची रक्कम न दिल्याबाबत**

**(१२) ७८३५ (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी तालुक्यातील (जि.जालना) रामगव्हाण पाझर तलावाच्या मावेजाची रक्कम न दिल्यामुळे जिल्हाधिकारी यांची खुर्ची, टेबल व गाडी माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात जप्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१), (२) व (३) होय.

मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सदर प्रकरणात रु. ६,२६,७६३/- इतका निधी जमा करण्यात आलेला आहे.

मा.न्यायालयात वाढीव मावेजा जमा करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करण्यात आली आहे.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) या परिसरात जलसंधारणाच्या कामांना मंजुरी मिळणेबाबत.**

**(१३) ८४८७ (०७-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) परिसरात जलसंधारणाची कामे मंजुर करण्याबाबत VIIDP च्या DPR-४ चा निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरातीसाठी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर VIIDP च्या DPR-४ च्या प्रस्तावाला तात्काळ मंजुरात देणेबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०८-२०१५) :** (१) होय, DPR-४ शासनास प्राप्त आहे.

(२) या कार्यक्रमांतग्रत लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत आतापर्यंत ५९६२ योजनांच्या रु. ९३३.१९ कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) शासनाने मंजूरी दिली आहे. या कार्यक्रमांतर्गत निर्मित दायित्व व केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने पुढील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूरीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावली (जि.चंद्रपूर) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या विहिरगाव येथील उपकेंद्रांत एकच परिचर कार्यरत असल्याबाबत**

**(१४) ८६३९ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या अंतरगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत येत असलेल्या विहिरगाव येथील उपकेंद्र एका परिचरांच्या सहाय्याने चालत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या उपकेंद्रात आवश्यक ते वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी वर्ग देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०८-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. मौजे विहीरगाव येथे ॲलोपॅथीक दवाखाना आणि उपकेंद्र अशा दोन आरोग्य संस्था कार्यरत आहेत. ॲलोपॅथीक दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी गट ब व परिचर ही पदे मंजूर असून दोन्ही पदे भरलेली आहेत. तर उपकेंद्रामध्ये आरोग्य सेवक (स्त्री) व आरोग्य सेवक (पुरुष) ही पदे मंजूर असून दोन्ही पदे भरलेली आहेत.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) येथील १०० खाटांच्या रुग्णालयांचे बांधकाम मंजूरीबाबत**

**(१५) ८६५२ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२-२०१३ मध्ये उपजिल्हा रुग्णालय, वरोरा (जि.चंद्रपूर) येथील १०० खाटांच्या रुग्णालयांचे बांधकाम मंजूरीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २०.१.२०१५ रोजीच्या सुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना एक लेखी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप या संदर्भात मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ चंद्रपूर यांना उपजिल्हा रुग्णालय, वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे ५० खाटावरुन १०० खाटांचे इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त होताच त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

---

**नागपूर जिल्हयातील मौदा तालुक्यात एचआयव्ही रक्त तपासणीच्या नावावर युवकांच्या जीवांशी खेळ करीत असलेली संस्था ग्रामीण भागात सक्रीय असल्याबाबत**

**(१६) ८७३६ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील मौदा तालुक्यात एचआयव्ही रक्त तपासणीच्या नावावर युवकांच्या जीवांशी खेळ करीत असलेली संस्था ग्रामीण भागात सक्रीय असल्याचा प्रकार समोर येत असल्याबाबतचे वृत्त दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या सुपरवायझरने एचआयव्ही तपासणीकरीता ५० युवकांचे ५ एम.एल.रक्त संकलित केले असुन तो प्रशिक्षित नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्त तपासणी नमुने संकलित करणारे आरोग्यसेवक किंवा प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रशिक्षित नसेल तर उक्त रक्त नमुना देणाऱ्याच्या मृत्युही होऊ शकतो असे असतानाही तपासणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा अनुभव नसणाऱ्या व्यक्तींना रक्त तपासणीचे काम देणाऱ्या संस्थांवर तेथील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) अद्यापि कार्यवाही न करण्याची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.

एचआयव्ही रक्त तपासणीच्या नावावर युवकांच्या जिवाशी खेळ या सदराखाली दि.२६.०१.२०१५ रोजी वृत्तपत्रात बातमी छापून आली होती.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयातील मौदा तालुक्यात दि.२३ जानेवारी, २०१५ रोजी सहयाद्री बहुउद्देशीय संस्थेद्वारे एचआयव्ही रक्तचाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर दिवशी रक्त संकलन करणारी व्यक्ती प्रशिक्षित असून, एचआयव्ही तपासणी करीता २ एम.एल. रक्त संकलित करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

दि. २३ जानेवारी, २०१५ रोजी एचआयव्ही तपासणी करीता रक्त संकलन करताना व केल्यानंतर कोणत्याही अशिलाला त्रास झालेला नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थित एचआयव्ही व एसटीडी शिबिर घेण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मासेवाडी - दुगूनवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावाच्या कामास मंजूरी मिळूनही भूसंपदान न झाल्याबाबत**

**(१७) ८७७२ (०८-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मासेवाडी - दुगूनवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावाच्या कामास मंजूरी मिळूनही भूसंपदान न झाल्याने तलावाच्या कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी भूसंपादन करुन प्रकल्पाचे काम तातडीने करणेबाबतची मागणी मा.ग्रामविकास व जलसंधारण मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर योजनेस जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील दि. २९/०२/२००० रोजीच्या ठरावानुसार रु. ७६.२४ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार काम सुरु करण्याचे आदेश दिनांक २९/०६/२००० रोजी देण्यात आले आहे. परंतु मासेवाडी येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे कामास सुरुवात करता आली नाही. सदर योजनेची भुसंपादन प्रक्रिया पोलिस संरक्षणात पुर्ण करुन भूसंपादनाची रक्कम रु. १४.१० लक्ष महसूल विभागास देण्यात आली होती. परंतु प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी रक्कम स्विकारण्या दर्शविलेल्या ठाम विरोधामुळे महसूल खात्याने रक्कम परत केली आहे. प्रशासकीय मान्यता माहे २/२००० मध्ये मिळूनही भूसंदान विरोधामुळे माहे ७/२००९ अखेर देखील प्रत्यक्ष काम सुरु झाले नाही. सबब महाराष्ट्र सा.बां. नियम प्रस्तिका परिच्छेद क्र. २६२ पान क्र. ११४ नुसार प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्यामुळे निविदा रद्द करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील राजीव गांधी जीवनदायी योजनेबाबत**

**(१८) ८९४१ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेतील लाभार्थ्यांवर उपचार करण्यासाठी सोलापूर जिल्हयातील १६ हॉस्पीटलना सूचित केले असून त्यासाठी सदरील हॉस्पिटल्सना रूग्णांसाठी २५ टक्के बेड आरक्षित ठेवणे सक्तीचे असूनही रूग्ण उपचारास दाखल झाल्यावर त्या रुग्णांना जीवनदायीचा बेड शिल्लक नसल्याचे सांगितले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रूग्णांकडून योजनेचा लाभ न घेता बिल भरण्यास तयार आहे असे लिहून घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती रूग्णांना जीवनदायी योजनेचा लाभ न देणाऱ्या हॉस्पीटल्समधील व्यवस्थापनेतील अधिकारी/कर्मचारी व डॉक्टर्स यांचेवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(५) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) नाही.

राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत अंगीकृत रुग्णालयांनी योजनेच्या लाभार्थ्यांकरिता २५ टक्के खाटा आरक्षित ठेवणे बंधनकारक असून सोलापूर जिल्हयातील रुग्णांलयानी खाटा शिल्लक नसल्याने रुग्णास दाखल करुन घेण्यास नकार दिल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारदाळ, खोतवाडी व कोराची (ता.इचलकरंजी, जि.कोल्हापूर)**
**या गांवामध्ये सिमेंट नाला बांधण्याबाबत**

**(१९) ९१३७ (०८-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारदाळ, खोतवाडी व कोराची (ता.इचलकरंजी, जि.कोल्हापूर) या गांवामध्ये सिमेंट नाला बांधण्याची एकूण ४० पैकी १८ कामे अद्याप अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील १८ कामांसाठी रूपये ८३ लाख इतकी रक्कम देण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त संदर्भान्वये सभागृहाला आश्वासित केल्यानुसार माहे जानेवारी २०१५ अखेरपर्यंत वस्तुस्थिती काय,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तारदाळ खोतवाडी व कोरोची (ता.इचलकरंजी, जि.कोल्हापूर) या गावांमध्ये एकूण ३० सिमेंट नाला बांधण्याचे प्रस्तावित असून २१ सि.ना. बांधरे पूर्ण झाले असून ९ कामे शिल्लक आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) या ९ बंधाऱ्यांची कामे निधी उपलब्धतेनुसार विविध योजनेतून करण्याचे नियोजन असल्याचे सभागृहास आश्वासीत केले होते. आता मौजे तारदाळ येथील ६ व मौजे कोरोची येथील ३ असे एकूण ९ बंधारे बांधण्यास स्थानिक शेतकरी त्यांच्या बैलगाडीची वाट व उस वाहतूकीची वाट असल्याने परवानगी (कन्सेंट) देत नसल्याने सदरची कामे होऊ शकत नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती तालुक्यातील उसळगव्हाण या तलावाच्या भिंतीला**
**मधून रेगलेटरमधून पाणी गळतीबाबत**

**(२०) ९२८५ (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती तालुक्यातील उसळगव्हाण या तलावाच्या भिंतीला मधून रेगलेटरमधून पाणी गळती होऊन शेतात पाणी साचत असल्यामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणात होणारे नुकसान थांबविण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अधिका-यांना लघु सिंचन विभाग, जि.प.अमरावती यांना दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सिंचन तलाव उसहगव्हाण ता.धामणगाव रेल्वे कामाची दुरुस्ती विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम डी.पी.आर. चार (४) मध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमतांतर्गत लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत आतापर्यंत ५९६२ योजनांच्या रु. ९३३.१९ कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) शासनाने मंजूरी दिली आहे. या कार्यक्रमांतर्गत निर्मित दायित्व व केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा अनुषंगाने पुढील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR ) मंजूरीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामिण रुग्णालय देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथे**
**कालबाह्य औषधांचे वितरण होत असल्याबाबत**

**(२१) ९४२३ (०७-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामिण रुग्णालय देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथे रुग्णालयातील स्टोअर रुम मध्ये कालबाह्य झालेली १००० गोळ्यांची पेटी व १५० गोळ्यांचा डब्बा दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उपरोक्त रुग्णालयाच्या भोगळ कारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, रुग्णालयाच्या भोंगळ कारभाराबाबत शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी वैद्यकीय अधिक्षक, सामान्य रुग्णालय, खामगांव, जि. बुलढाणा व औषध निर्माण अधिकारी, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात आले आहे:-

(१) ग्रामीण रुग्णालय, देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथे टेट्रासायक्लीन (Tetracyclin) या औषधाच्या १०४० कॅप्सुल नोंव्हेबर २०१४ मध्ये मुदतबाहय झाल्या होत्या. तथापि, मुदतबाहय झालेल्या टेट्रासायक्लीन गोळया कोणत्याही रुग्णांना वितरीत करण्यात आलेल्या नाहीत.

(२) सदर औषधसाठा मुदतबाहय होण्यापुर्वी सदर औषधाचा वापर करण्याच्या दृष्टीने रुग्णालयीन प्रशासनाने योग्य ते प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते.

(३) मुदतबाह्य झालेल्या औषधीच्या साठयाची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २२.१२.२०१० च्या मार्गदर्शक सुचनांचे योग्य पध्दतीने पालन झाल्याचे दिसते.

(४) ग्रामीण रुग्णालय, देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील औषध निर्माण अधिकारी तसेच वैद्यकीय अधिक्षक यांच्या स्तरावर कुठेही अकार्यक्षमता झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोयना धरणाच्या (ता.पाटण, जि.सातारा) आत अवसरी सेंटर असणाऱ्या भागात अनाधिकृत उभारलेल्या रिसॉर्टची चौकशी होणेबाबत**

**(२२) १०१८८ (०७-०४-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील कोयना धरणाच्या आत अवसरी सेंटर असणाऱ्या भागात या तालुक्यातील श्रमजिवी संस्थेने अनाधिकृत रिसॉर्ट उभारले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या रिसॉर्टमध्ये खाजगी पर्यटकांना हे रिसॉर्ट उपलब्ध करून दिले जात असून याप्रकारामुळे धरणाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २९ जानेवारी, २०१५ च्या जिल्हा नियोजन समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये अवसरी सेंटर याठिकाणी श्रमजिवी संस्थेने उभारलेल्या अनाधिकृत रिसॉर्टची चौकशी करून त्या संस्थेवर व संस्थाचालकावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,

(५) नसल्यास, चौकशी न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) दिनांक २९.०१.२०१५ रोजी जिल्हा नियोजन समितीच्या झालेल्या बैठकीत श्री.शंभूराज देसाई, विधान सभा सदस्य यांनी अवसरी सेंटरमध्ये (कोयना बॅक वॉटर) श्री.कोळेकर हे एकटेच राहत असून अतिक्रमण करुन ते त्या जागेचा व्यावसायीक वापर करतात. तसेच त्या ठिकाणी अनधिकृत घटना घडतात याबाबत जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी अशी मागणी केली होती.

सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता श्रमजीवी जनता सहाय्यक मंडळ राममळा (गोषटवाडी), मा.पाटा या संस्थेला १९८९ साली मौजे आरल (अवसरी) ता.पाटण येथील स.नं. १६ क्षेत्र ५ हे. ५५ आर बक्षीस पत्राने मिळाले आहे. सदर जागेवर संस्थेने कच्चे बांधकाम असलेल्या तीन घरात संस्थेच्या कार्यक्रमाचे अनुषंगाने त्यांचे कार्यकर्त्यांचे निवास व प्रशिक्षण १९८० पासून घेत होते.

तेथे कोयना धरण अंतर्गत येणाऱ्या गावातील लोकांसाठी दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, स्वस्त धान्य दुकान तसेच स्थानिक लोकांसाठी जागृती व संघटनेचे कामकाज केले जात होते.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये येणाऱ्या गावांचे पुनर्वसन झाल्याने सदर संस्थेच्या कच्च्या बांधकामाची तीन घरे व सर्व उपक्रम बंद आहेत. वाहतूकीच्या सोयी नसल्यामुळे अवसरी सेंटर येथे पर्यटन जाणे-येणे शक्य नाही, त्यामुळे पर्यटन, लॉजिंग-बोर्डिंग अशा प्रकारचे व्यवसाय चालू असल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात शिवना येथील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात असल्याबाबत**

**(२३) १०३६१ (०७-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यात (जि.औरंगाबाद) शिवना येथील प्रभाग क्रमांक चारमधील जैन मंदिरालगतच्या सोनरगल्लीसह रोहिलेगल्लीतील शेवडी विहिरीजवळ व प्रभाग क्रमांक दोनमधील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीलगत मोठ्या प्रमाणावर घाण, कचरा साचल्याने ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात घाण व कचरा सडल्यामुळे उग्र दर्प असलेली दुर्गंधी पसरली असल्याने तेथील रहिवासी त्रस्त झाले आहेत हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यकत कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र, शिवना (जि.औरंगाबाद) परिसरातील कचऱ्याची साफसफाई करण्याबाबत शिवना ग्रामपंचायतीस कळविण्यात आले. ग्रामपंचायतीमार्फत साफसफाईचे काम सुरु असुन या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाहय रुग्ण विभागात साथरोगजन्य आजारांचे रुग्ण आढळून आले नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेले सेवक व इतर कर्मचारी यांचे वेतन देण्यात आलेले नसल्याबाबत**

**(२४) १०३८१ (०७-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेले आरोग्य सेवक व इतर कर्मचारी यांचे वेतन माहे नोव्हेंबर, २०१४ पासून आरोग्य विभागाकडून देण्यात आलेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थकीत झालेले वेतन देण्यासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अदयापर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास सर्वसाधारण विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास केव्हा व किती दिवसात करणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०८-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
माहे नोव्हेंबर, २०१४ पासून जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन हे पंचायतराज सेवार्थ प्रणालीतून ऑनलाईन करण्यात आले असून सदर महिन्याचे वेतन दिनांक १५ जानेवारी, २०१५ ला करण्यात आले. या नविन प्रणालीमुळे उशिराने वेतन झालेले आहे.
(२) वेतन अदा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि. नांदेड) तालुक्यातील नादुरुस्त तलावाबाबत**

**(२५) १०४३२ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि. नांदेड) तालुक्यातील नादुरुस्त असलेल्या सिंचन तलाव, पाझर तलाव व मालगुजारी तलावातील गाळ काढणे व तलावाची दुरुस्ती करण्यासंबंधी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावातील गाळ काढून तलाव दुरुस्ती करण्यासंबंधी शासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्यापी कार्यवाही झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.

जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत प्राप्त होणाऱ्या निधीच्या १०% रक्कम जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गावातील तलाव/कोपब दुरुस्तीसाठी वापरुन तलावांची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

तसेच लोकसहभागातून देगलून व बिलोली तालुक्यातील प्रत्येकी सात तलावातील गाळ काढण्यात आलेला आहे व उर्वरित तलावातील गाळ काढण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील हॉस्पीटमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समिती नेमण्याचा निर्णय**

**(२६) १०८९१ (०७-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हॉस्पीटमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत गरजूवर मोफत उपचार होत आहेत किंवा नाहीत यावर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समिती नेमण्याचा निर्णय पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी माहे जानेवारी २०१५ च्या दुस-या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हॉस्पीटलने किती गरजुवर उपचार केले आहेत याचे ऑडीट ही समिती करणार असून गरजूना हा लाभ न देणाऱ्या हॉस्पीटलवर काय कारवाई करणार आहे,

(३) असल्यास, ज्या हॉस्पीटलमध्ये गरजूंना लाभ दिला जात नाही अशा हॉस्पीटलचे परवाने रद्द करणार आहात काय ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) होय, जिल्हा नियोजन समितीच्या दि. १६.०१.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये पुणे जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी समिती स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.

(२) अदयाप जिल्हास्तरीय समितीची रचना व त्यावर नियुक्त करावयाच्या सदस्यांची शिफारस प्राप्त झालेली नाही. सदर माहिती प्राप्त होताच समिती गठीत करण्याची सोसायटीकडून वा जिल्हाधिकारी कार्यालय, पूर्ण यांचेकडून करण्यात येईल.

(३) ज्या रुग्णालयासंदर्भात लाभार्थ्यांस योजनेंतर्गत उपचारास नकार देणे वा अन्य स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त होतात, अशा तक्रारीचे निराकरण न केल्यास संबंधित रुग्णालयास योजनेंतर्गत निलंबित करण्याची किंवा अंगीकरण रद्द करण्याची कारवाई रुग्णालय अंगीकरण व निस्तभंग समितीमार्फत केली जाते.

---

**परभणी जिल्हा सामान्य रूग्णालयासह उपरूग्णालयातील अनेक महत्वाची पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याबाबत**

**(२७) १०९९६ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा सामान्य रूग्णालयासह उपरूग्णालयातील अनेक महत्वाची पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रूग्णालयातील जिल्हा शल्य चिकित्सक निवासी वैद्यकीय अधिकारी, जनरल सर्जन वर्ग ०१, जनरल सर्जन वर्ग २, फिजीशियन, अस्थिरोग तज्ञ, आदी पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे रूग्णांच्या सेवेवर त्यांचा गंभीर परिणाम होत आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय परभणी व उपजिल्हा रुग्णालय, गंगाखेड आणि सेलू या रुग्णालयांत वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१ ची एकूण मंजूर पदे २० असून, त्यापैकी ८ पदे भरलेली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ची एकूण मंजूर पदे ५१ असून, त्यापैकी ४३ पदे भरलेली आहेत.

(३) जिल्हा रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधीक्षकांची पदे रिक्त असली तरी वैद्यकीय अधिकारी संवर्गातील तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(४) व (५) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**राशिवडे (जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील असणारे वैद्यकिय अधिकारी वारंवार गैरहजर राहत असल्याबाबत**

**(२८) ११२०२ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राशिवडे (जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील असणारे वैद्यकिय अधिकारी वारंवार गैरहजर राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागतात हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी गैरहजर राहण्याची कारणे काय आहेत तसेच त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०८-२०१५) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र राशिवडे (जि.कोल्हापूर) येथील २ पदांपैकी एक पद रिक्त असून कार्यरत वैद्यकीय अधिकारी रजेवर असल्याने या कालावधीत जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सदर पदाचा कार्यभार देऊन त्यांच्यामार्फत रुग्णांना रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्र राशिवडे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमितपणे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित राहण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या स्तरावरुन सक्त ताकीद देण्यात आली आहे.

---

**मुंबई उपनगरातील शासकीय रुग्णालयातील व्हेंटीलेटरचे प्रमाण अतिशय कमी असल्याबाबत**

**(२९) ११३४१ (०६-०४-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील शासकीय रुग्णालयातील व्हेंटीलेटरचे प्रमाण अतिशय कमी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपनगरातील गंभीर आजारी रुग्ण व अपघाताचे रुग्ण यांना व्हेंटीलेटरची गरज असल्यास त्यांच्या उपचाराकरीता त्यांना नायर, सायन, केईएम व जे.जे. रुग्णालयांत हलवावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपनगरात शासन व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याबाबत गंभीर आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे. कारण मुंबई उपनगरात महानगर पालिकेची मोठी रुग्णालये आहेत तेथे व्यवस्था असल्याने गंभीर रुग्ण तेथे दाखल होतात.
(३) मुंबई उपनगरात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सामान्य रुग्णालय, मालवणी-मालाड, मुंबई हे रुग्णालय आहे. या रुग्णालयाकरिता जिल्हा नियोजन समिती मार्फत जिल्हा शल्य चिकीत्सक, ठाणे यांचेकडून लवकरच व्हेंटीलेटरचा पुरवठा करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयात मोठ्या प्रमाणात डॉक्टराची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) ११३५५ (०६-०४-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयात मोठ्या प्रमाणात डॉक्टराची पदे रिक्त असल्याने रुग्णांना सेवेचा लाभ मिळण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर रुग्णालयातील रिक्त असलेली डॉक्टराची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ वर्ग - १ संवर्गाचे १९ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची २८ पदे मंजूर असून त्यापैकी २६ पदे भरण्यात आलेली आहेत.उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येते.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) स्वतंत्र निवड मंडळामार्फत शिफारसप्राप्त उमेदवारांमधून एप्रिल-मे, २०१५ मध्ये ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यात गत् वर्षी करण्यात आलेल्या साखळी**
**बंधा-यांच्या कामाची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ११५३३ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :**सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यात गत् वर्षी करण्यात आलेल्या साखळी बंधा-यांच्या कामाची देयके माहे जानेवारी, २०१५ अखेर प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर देयके प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर देयके तातडीने अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०७-२०१५) :** (१) होय
जालना जिल्हयातील बदनापुर तालुक्यातील कृषी यंत्रणेमार्फत करण्यात आलेल्या बंधाऱ्याचे रु.९७.३१ लक्ष रक्कमेची निधी अभावी काही देयके प्रलंबित होती.
(२) साखळी सिमेंट नालाबांध कार्यक्रमास अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीपैकी वित्त विभागाने प्रथमत: ६० टक्के निधी वितरणासाठी उपलब्ध करुन दिला होता. तद्नंतर मार्च २०१५ मध्ये उर्वरित ४० टक्के निधी वितरणासाठी उपलब्ध करून दिला.
(३) दि. १२ मार्च २०१५ च्या शासननिर्णयान्वये निधी वितरित करण्यात आला असून त्यातून प्रलंबित देयके अदा करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हा स्त्री रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी**
**भूल तज्ञे व तज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३२) ११५४६ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हा स्त्री रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी भूल तज्ञे व तज्ञ डॉक्टरांची तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) जालना येथील स्त्री रुग्णालयातील भुलतज्ञ व स्त्रीरोगतज्ञाचे पद भरण्यात आले असून बालरोग तज्ञांचे पद रिक्त आहे. तसेच जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ९० पदे मंजूर असून त्यापैकी ६७ पदे भरण्यात आलेली आहेत.
(२) व (३) स्त्री रुग्णालय, जालना येथील बालरोग तज्ञाचे पद भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु असून वैद्यकीय अधिकारी संवर्गात २५ उमेदवारांना एप्रिल-मे २०१५ मध्ये नियुक्तीचे आदेश दिले आहेत. उर्वरित पदे भरण्याकरीता निवड प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा उमरी तुमगाव लघु पाटबंधारे तळावत (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील भूसंपादनाचा मोबदला शेतक-यांना देण्याबाबत**

**(३३) ११७३३ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा उमरी तुमगाव लघु पाटबंधारे तळावत (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, या भूसंपादनाचा मोबदला शेतक-यांना देण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, किती शेतकऱ्यांना मोबदला मिळाला आहे व उर्वरित शेतक-यांना केव्हापर्यंत जमिनीचा मोबदला देण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०८-२०१५) :** (१), (२) व (३) सदर प्रकल्पाकरिता एकुण ६७.९१ हे जमीन भुसंपादित करावयाची होती. त्यापैकी ३२.२३ हे. जमीन भुसंपादीत करुन त्यात समाविष्ट सर्व २२ शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आलेला आहे. उर्वरित ३५.६८ हे. जमीनीचे भुसंपादन प्रस्तावास मंजुरी प्राप्त होताच उर्वरित सर्व शेतकऱ्यांना त्यांचा जमीन मोबदला देण्याचे प्रस्तावित आहे.

---

**सोलापूर जिल्हा रुग्णालय येथे राजीव गांधी जीवनायी योजनेअंतर्गत उपचारासाठी उपचाराचे पैसे अगोदर द्यावे लागत असल्याबाबत**

**(३४) ११९१० (०६-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा रुग्णालय येथे राजीव गांधी जीवनायी योजनेअंतर्गत उपचार मोफत असताना उपचारासाठी उपचाराचे पैसे अगोदर द्यावे लागतात असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) नाही.

तथापि छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपच्चार रुग्णालय, सोलापुर यांच्याकडून अतिरिक्त पैसे घेतल्या संदर्भात १७३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) व (३) सदर १७३ तक्रारी पैकी १३२ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून ४१ तक्रारींचे निवारण करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रलंबित तक्रारीचे निराकरण होईपर्यंत या प्रकरणांमधील दाव्यांची रक्कम प्रलंबित ठेवण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अपंगांना अपंगत्वाचा दाखला मिळवण्यासाठी ८ - १२ महिने लागण्याबाबत**

**(३५) ११९१३ (०६-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपंगांना अपंगत्वाचा दाखला मिळवण्यासाठी ८ - १२ महिने लागतात असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) नाही.

अपंगत्व प्रमाणपत्रासंदर्भात वाढत्या तक्रारी विचारात घेऊन दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ च्या शासन निर्णयान्वये अपंगत्व मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरण ऑनलाईन करण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून त्यानुसार अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र त्याच दिवशी द्यावे. असे निर्देश दिलेले आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील २२ जिल्ह्याच्या सामान्य रुग्णालयात सिटी स्कॅन, एमआरआय इत्यादी यंत्रणा बसविण्याबाबत**

**(३६) १२३७६ (०६-०४-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २२ जिल्ह्याच्या सामान्य रुग्णालयात सिटी स्कॅन, एमआरआय इत्यादी यंत्रणा बसविण्याचे शासनाने आदेश सुमारे साडेतीन वर्षापूर्वी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा वगळता इतर २१ जिल्ह्यात ही यंत्रणा अद्यापही कार्यान्वित झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यांची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, इतर जिल्ह्यात ही यंत्रणा केव्हा कार्यान्वित होणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०७-२०१५) :** (१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील २२ रुग्णालयांमध्ये सार्वजनिक खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर रेडिओलॉजी इमेंजिग डायग्नॉस्टिक सेंटर सुरु करण्याच्या दृष्टीने मे. विप्रो जी. ई. हेल्थ केअर यांच्यासमवेत दिनांक २०.१२.२०१२ रोजी करार (Concession Agreement) करण्यात आलेला आह.

(२), (३) व (४) सार्वजनिक खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर रेडिओलॉजी इमेंजिंग डायग्नॉस्टिक सेंटर सुरु करण्याच्या दृष्टीने संबंधित रुग्णांलयामध्ये जागा तसेच आवश्यक असलेला उच्च दाबाचा विद्युत पुरवठा मे. विप्रो जी. ई. हेल्थ केअर यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तथापि, जिल्हा रुग्णालय, औध, जि. पुणे वगळता उर्वरित रुग्णालयांमध्ये सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावर रेडिओलॉजी इमेंजिंग डायग्नॉस्टिक सेंटर अद्याप कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे मे. विप्रो जी. ई. हेल्थ केअर या कंपनीस काळया यादीत का टाकण्यात येऊ नये, याबाबत दिनांक १७.०४.२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

---

**लातूर जिल्ह्यातील कोल्हापूरी बंधारे प्रस्ताव निधीअभावी मंजूर न करता परत पाठविण्यात आल्याबाबत**

**(३७) १३२६५ (०८-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील लखनगाव, बिरवली, सलगरा, गोढाळ, कोष्ठगाव, बिरवली २, कवठा केज, बोरगाव, कातपूर, पिंपळगाव (अंबा) ढाकणी, एकुरगा, खंडाळा, माटेफळ येथील कोल्हापूरी बंधारे प्रस्ताव लघु पाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, लातूर यांनी जिल्हा परिषद, लातूर यांचेकडे मंजूरीस्तव सादर करुनही सदर प्रस्ताव निधीअभावी मंजूर न करता परत पाठविण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गावात कोल्हापूरी बंधारे बांधण्याकरीता निधी परत वळवून घेण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

लातूर जिल्ह्यातील सलगरा, गोढाळा, कोष्टगाव, बिरवली २, कवठा केज, बोरगाव, कातपूर, पिंपळगाव (अंबा), खंडाळा, माटेफळ येथील २० हेक्टर दरम्यान सिंचन क्षमता असलेले कोल्हापूरी बंधार कामाची अंदाजपत्रके लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, लातूर यांनी जिल्हा परिषद, लातूर यांचेकडे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केली होती. निधी उपलब्ध नसल्याने अंदाजपत्रके जिल्हा परिषदेने परत केलेली आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जळगाव जिल्हयातील १०८ बंधाऱ्यापैकी फक्त ५५ बंधाऱ्यामध्ये पाणी साठल्याबाबत

**(३८) १३३२४ (०८-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील १०८ बंधा-यापैकी फक्त ५५ बंधा-यामध्ये पाणी साठले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ५५ बंधा-यात पाणी न साठविण्याची कारणे काय आहेत,
(३) सदर बंधा-यात पाणी साठविण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद जळगाव यांचेकडून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात १०९ बंधाऱ्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली होती आणि त्यापैकी निधीच्या उपलब्धतेनुसार ९२ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे सुरु करण्यात आली होती. त्यामधील भौतिक दृष्ट्या ५६ कामे पूर्ण झाली असल्यामुळे सदर बंधाऱ्यामध्ये पाणी साठविले आहे.

उर्वरित ३६ कामे ही प्रगतीपथावर असल्याने सदर बंधाऱ्यामध्ये पाणी साठविणे शक्य झाले नाही. मात्र हि प्रगतीपथावर असलेली कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

---

**भंडारा जिल्ह्यात जिल्हा परिषदेंतर्गत मंजूर लघू सिंचन ३ उपविभाग मोहाडी, तुमसर, लाखांदूर येथे उघडण्याबाबतचे निवेदनाबाबत**

**(३९) १४२८२ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात जिल्हा परिषदेंतर्गत मंजूर लघू सिंचन ३ उपविभाग मोहाडी, तुमसर, लाखांदूर येथे उघडण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे, निवेदन दिनांक १-२-२०१५ रोजी दिले आहे.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद भंडारा यांच्या दि.६.५.२०१५ च्या पत्रान्वये सुधारित प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यावर आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका येथे नरवीर बाजीप्रभु देशपांडे यांच्या व राजांना मिळालेल्या जमिनीवर वन जमिनीचे आरक्षण टाकल्याबाबत**

**(४०) १४६९३ (०८-०४-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका येथील छत्रपती शिवाजी महाराजांसाठी प्राणाचे बलिदान करणाऱ्या नरवीर बाजीप्रभु देशपांडे यांच्या व राजांना मिळालेल्या जमिनीवर वन जमिनीचे आरक्षण टाकण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनीवर बदलापूर नगरपालिकेने अनधिकृत स्मशानभुमी बांधल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने बाजीप्रभुंच्या वारसांवरील अन्याय दूर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०८-२०१५) :** (१) बदलापूर नगरपरिषद मंजूर विकास आराखड्यात सदरची जमीन फॉरेस्ट झोन म्हणून दर्शविण्यात आली आहे.

(२) बदलापूर नगरपालिका सन ११९२ मध्ये स्थापन झाली असून त्यापूर्वीपासून ग्रामपंचायतीचे कालावधीपासून परंपरागत उघड्यावर अंत्यसंस्कार करण्यात येत होते. परंतु सन १९९८ ला ठराव करुन नगरपालिकेने सदर जागेवर स्मशानभुमी शेड व कंपाऊड वॉल बांधलेले आहे.

(३) व (४) सदरची बाब ही मालमत्ताधारक व नगरपरिषद यांचेमधील असून नुकसान भरपाई बाबत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात येईल.

---

**बीड जिल्हयातील सुमारे १७४ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांना दरवाजे नसल्याबाबत**

**(४१) १५३६८ (०९-०४-२०१५). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ ते २००२ या कालावधीत बीड जिल्हयात बांधण्यात आलेल्या ३४७ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांना दरवाजे बसवून त्याची दुरुस्ती करण्याचा ३७ कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हा परिषद बीड यांचेकडून शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधा-यांना दरवाजे नसल्यामुळे सुमारे ८४४.१५ दशलक्ष घनफूट पाणी वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह यातील सततची टंचाई व दुष्काळ परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा परिषद, बीड यांनी पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१), (२) व (३) दुरुस्ती व परिरक्षण योजनेखाली निधी मागणीप्रस्ताव सदर करण्याची कार्यपध्दती शासन परिपत्रक दिनांक ०७/११/२०१३ प्रमाणे निर्धारित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद बीड यांनी दिनांक २९/१२/२०१४ च्या पत्रान्वये सादर केलेला रु. ३७.१० कोटी दायित्वचा दुरुस्ती निधी प्रस्ताव सदर परिपत्रकानुसार पाठविण्यात आला नसल्याने दुरुस्ती कामांची शासन परिपत्रक दिनांक ०७/११/२०१३ प्रमाणे परत करण्यात आला आहे.

दरम्यानच्या काळात मराठवाडा विभागातील लघु सिंचन (जलसंधारण) प्रकल्पांच्या खराब व गहाळ झालेल्या ३४,१६५ दरवाजांच्या जागी नवीन दरवाजे बसविण्याचा रु.२३.९२ कोटी दायित्वाचा प्रस्ताव दिनांक १३/०३/२०१५ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता लघु सिंचन (जलसंधारण) पुणे कार्यालयाने शासनाकडे सादर केला आहे. निधी उपलब्धतेनुसार शासनाकडून यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत**

**(४२) १५४२४ (०९-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा शासनाने अपंगांच्या दाखल्याबाबत नवे धोरण केले आहे मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळत नसल्याने अपंग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाकडे राज्यातील अपंगाकडे असलेले पूर्वीचे दाखले रद्द करून नवीन दाखले घेणे अपरिहार्य केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन यंत्रणेमुळे चार ते सहा महिने प्रमाणपत्रासाठी लागत असल्यामुळे चालता न येणा-या व्यक्तींना हेलपाटे मारावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व ठिकाणी अपंगत्वाचे दाखले देणारी यंत्रणा पूर्ण क्षमतेने उपलब्ध केली जात नाही तोपर्यंत सर्व प्रकारच्या सवलतीसाठी जुनेच दाखले ग्राहय समजण्याचे आदेश राज्य परिवहन शिक्षण विभाग, आरटीओ सामाजिक न्याय विभागास देणेबाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे काय,
(५) असल्यास, निर्णयाचा तपशील काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) नाही, राज्यात दि. ३ डिसेंबर २०१२ पासून संगणक प्रणालीद्वारे अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्यात आतापर्यंत ३१६७१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २१२४४ अपंगांना प्रमाणपत्र देण्यात आले असून ४६४३ अर्ज नाकारण्यात आले आहेत. उर्वरित ५७८४ अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(२) नाही.
(३) नाही.
(४) व (५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अपंगाच्या विविध मागण्या संदर्भात झालेल्या बैठकीमधील निर्देशानुसार दि.२२.४.२०१५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये जोपर्यंत अपंगाना ऑनलाईन सुधारीत प्रमाणपत्र प्राप्त होत नाही. तोपर्यंत जुन्या प्रमाणपत्राच्या आधारे एस.टी. आणि रेल्वे प्रवास करताना असुविधा होणार नाही. याबाबत आयुक्त. अपंग कल्याण यांनी योग्य दक्षता घ्यावी. असा निर्णय घेण्यात आला आहे.

---

### तळेगाव व कामशेत हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत्यूचे दाखले त्वरित देणेबाबतच्या आदेशाबाबत

**(४३) १५४२७ (०९-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मृतदेहाचे पोस्टमार्टेम कक्षाची इमारत जुनी असून सध्या या इमारतीचे नुतनीकरणाचे काम चालू असल्यामुळे पोस्टमार्टेम कक्ष माहे मे २०१४ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळेगाव व कामशेत हद्दीतील नोंदीबाबत उद्भवलेल्या या तांत्रिक अडचणीमुळे मृतांच्या नातेवाईकांची हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालिका प्रशासन, पोलीस अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांना याबाबत समन्वय साधून तात्काळ मृत्यू दाखला देणेबाबत आदेश देण्यात आले आहेत काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) शवविच्छेदन कक्षाची दुरुस्ती पूर्ण झाल्याने दिनांक १९.०१.२०१५ पासून केंद्रात शवविच्छेदन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. शवविच्छेदन कक्षाच्या दुरुस्तीच्या कालावधीत शवविच्छेदनाची व्यवस्था जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र खडकाळा (कामशेत) येथे करण्यात आली होती.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हा- ईएसआय योजनेचा लाभ अधिकाधिक कामगारांना आरोग्य सेवेचा लाभ मिळण्याबाबत**

**(४४) १५४२९ (०७-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा- ईएसआय योजनेचा लाभ अधिकाधिक कामगारांना आरोग्य सेवेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने वेतन मर्यादा १५ हजार रुपये करण्याचा निर्णय राज्य कामगार विमा योजना कंपनीने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये मिळून सध्या दहा लाख कामगार योजनेचे सदस्य आहेत, परंतु दोन्ही महानगरामध्ये या सर्व कामगारांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी ईएसआय योजनेची पुरेशी यंत्रणा नाही, हे ही खरे आहे काय,
(३) कामगाराना मोठ्या आजारांवर उपचारासाठी एक तर मुंबई गाठावी लागते किंवा खासगी रुग्णालयात उपचार करुन वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती साठी अर्ज करुन वर्षानुवर्षे वाट पहावी लागते, हे ही खरे आहे काय,
(४) बिबवेवाडी येथे सुपर स्पेशलिटी रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव ईएमआयच्या कमिटी पुढे सादर झाला आहे मात्र हा प्रस्ताव कधी मंजूर होणार व प्रत्यक्षात तेथे रुग्णालय सुरु करणे बाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०७-२०१५) :** (१) होय.

राज्य कामगार विमा महामंडळाने सदर निर्णय सन २०१० पासून लागू केलेला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

पुणे आणि पिंपरी चिंचवड येथे एकूण ४,६१,७२१ नोंदणीकृत विमाधारक असून सुमारे १८ लाख लाभार्थी आहेत.

पुणे शहरातील ११९ विमा वैद्यकीय व्यवसायी,५ अधिकृत औषध विक्रते व ३ राकावियो सेवा दवाखान्यांमार्फत प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.

राकावि महामंडळामार्फत पुणे शहरातील एकूण ५ खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात आले असून ३ खाजगी रुग्णालयांमध्ये विशेषज्ञ आंतररुग्ण सेवा सुध्दा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

(३) अंशतः खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय चिंचवड पुणे मार्फत एकूण २,७४६ विमा रुग्णांना आंतररुग्ण उपचार पुरविण्यात आले असुन २३६ मोठया शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तसेच राज्य कामगार विमा महामंडळामार्फत सामंजस्य करार करण्यांत आलेल्या ५ खाजगी रुग्णालयांमार्फत एकूण ३९९ विमारुग्णांना अतिविशिष्ट वैद्यकीय उपचार पुरविण्यात आले आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत विमारुग्णांनी इतर खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास झालेल्या वैद्यकीय प्रतिपुर्ती करण्यात येते

राज्य कामगार विमा योजनेतील कर्मचाऱ्यांची पदे मोठयाप्रमाणत रिक्त असल्याने सदर प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होतो. उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या आधारे शक्य तेवढया लवकर सदर प्रकरणे निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येत असून एकूण २२२ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.

(४) बिबवेवाडी येथे राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात विशेषज्ञ आंतररुग्ण सेवा सुरु करता याव्यात या करीता सदर इमारतीचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करवून घेण्यासाठी दिल्लीस्थित राज्य कामगार विमा महामंडळाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी इमारतीचे बांधकामासाठी करार करण्यात आलेल्या उत्तर प्रदेश राज्य सरकार अंगीकृत उत्तर प्रदेश राजकीय निर्माण निगम लि. या संस्थेस इमारतीचे पर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास कळविले आहे. सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) राज्य कामगार विमा महामंडळ नवी दिल्ली यांनी प्रस्तावित केल्यानुसार राज्य कामगार विमा योजना केंद्र शासनास हस्तांतरण करण्याबाबत निर्णय घेतला होता. तथापी, हस्तांतरणाची कार्यवाही प्रलंबित राहील्याने नवीन धोरणात्मक निर्णय होऊ शकला नाही.

---

## पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील पुसाणे येथील धरणग्रस्तांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(४५) १५४३९ (०६-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील पुसाणे येथील लघुपाटबंधारे प्रकल्पामध्ये जमिनी गेलेले शेतकरी गेल्या १५ वर्षापासून नुकसान भरपाई मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९९९ साली हा प्रकल्प सुरु झाला तेव्हापासून या धरणग्रस्त शेतक-यांची दखल घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र ४९ हेक्टर असुन लाभक्षेत्र १७० हेक्टर आहे त्यावेळी पाण्याचा प्रश्न गंभीर असल्यामुळे पाण्याची गरज लक्षात घेऊन या प्रकल्पाला विरोध न करता पुसाणेव दिवड या दोन गावातील शेतक-यांनी आपल्या कसणा-या जमिनी दिल्या हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुसाणे येथील लघुपाबंधारे प्रकल्पामध्ये जमिनी गेलेल्या शेतक-यांना मोबदला मिळणेबाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पुसाणे प्रकल्पामध्ये गेलेल्या जमिनीचा अंतिम निवाडा जाहिर करण्यात आलेला आहे. सदर निवाड्यानुसार रक्कम रु. ४२,३६,११९/- ही धनादेश क्र. २२९८१५ दि. ०७.०७.२००६ अन्वये विशेष भुमी संपादन अधिकारी क्र. ४ यांचेकडे वर्ग केली आहे. सदर निवाड्याची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करणेसाठी हरकती घेतल्यामुळे निवाडा रक्कम पूर्ण वाटप झालेली नाही.

(३) होय, हे खरे आहे काय,

प्रकल्पामुळे सदर गावातील पाणी टंचाई दूर झाली असून शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे.

(४) होय.

उर्वरित राहिलेल्या क्षेत्राचा वाढीव पुरवणी प्रस्ताव जिल्हाधिकारी भुसंपादन शाखा पुणे यांना सादर केलेला आहे. तसेच पुरवणी भुसंपादनाच्या मोबदल्यापोटी २/३ रक्कम म्हणून रु. १५.०० लक्ष दिनांक २०.३.२०१५ रोजी विशेष भुमी संपादन अधिकारी क्र. २६ पुणे यांचेकडे जमा केलेले आहेत. पुढील कार्यवाही भुसंपादन शाखेमार्फत चालु आहे.

---

**दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ भंडारकवठे येथे वन क्षेत्रातील मुरुम विना परवानगी उपसण्यात आल्याबाबत**

**(४६) १५४५२ (०८-०३-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ भंडारकवठे येथे वन क्षेत्रातील मुरुम विना परवानगी उपसण्यात आला असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसील कार्यालयाने केलेल्या पंचनाम्यात वाळू ठेकेदार दोषी आढळून आले असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषी व्यक्तिविरोधात कार्यवाही करण्याबाबत तहसील तसेच वन विभाग यांनी नकार दिला, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कार्यवाही न करण्यामागची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, कार्यवाही करण्यास विलंब का लागत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०७-२०१५) :** (१) मौजे भंडारकवठे, ता.दक्षिण सोलापूर येथील ग.नं. ६८६/२ क्षेत्र ७४.१० हेक्टर वन क्षेत्रामधून ६६१८७ ब्रास एवढा मुरुम चोरी झालेला आहे. याबाबत दिनांक ४.९.२०१४ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) व (३) तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी मुरुम उपसाबाबत रु. २४,००,०००/- इतक्या दंडाची आकारणी करण्याबाबत दिनांक १.१०.२०१४ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाच्या विरोधात वाळू ठेकेदार यांनी उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र.२ सोलापूर यांचेकडे अपील केले आहे. त्या अपिलाच्या अनुषंगाने दिनांक ५.१.२०१५ रोजी स्थगिती देण्यात आली असून सदर प्रकरण उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला मतदारसंघात बहुतांश कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे, वळण बंधारे, पाझर तलाव सुस्थितीत नसल्याबाबत**

**(४७) १५९८२ (०९-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला मतदारसंघात बहुतांश कोल्हपूरी पध्दतीचे बंधारे, वळण बंधारे, पाझर तलाव सुस्थितीत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हा छोटे पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार २९ केटी बंधारे, वळण बंधारे, पाझर तलावांपैकी तब्बल १९ केटी बंधारे, वळण बंधारे, पाझर तलाव नादुरूस्त तसेच गळती आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हा छोटे पाटबंधारे विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे खरे आहे काय, नसल्यास, त्याच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०८-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

खडकवासला मतदारसंघातील २९ लघु पाटबंधारे कामांपैकी १६ कामे नादुरुस्त आहेत. त्यापैकी ०६ कामांची आर्युमर्यादा संपुरष्टात आलेली असल्यामुळे त्यांची दुरुस्ती व्यवहार्य नाही.

उर्वरित १० कामांपैकी ०६ कामांची दुरुस्ती झालेली असून ०१ काम प्रगतीत आहे आणि ०३ कामांची दुरुस्ती चालू आर्थिक वर्षात नियोजित आहे.

---

**रत्नागिरी जिल्हयातील लघुसिंचन जलसंधारण विभागातील ५४ योजनांकरिता सुमारे २५० कोटी रूपयांच्या निधीची आवश्यकता असल्याबाबत**

**(४८) १५९९४ (०९-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील लघुसिंचन जलसंधारण विभागातील ५४ योजनांकरिता सुमारे २५० कोटी रूपयांच्या निधीची गरज आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ५४ योजनांवर माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर किती निधीचा खर्च आला आहे व अद्यापही किती निधीची आवश्यकता आहे,

(३) उपरोक्त योजना तातडीने पूर्ण होण्यासाठी पूर्ण निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हयातील ५२ योजनांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

यापैकी ६ योजना पूर्ण आहेत. उर्वरित योजनाकरीता आणखी रुपये २३५.२० निधीची आवश्यकता आहे.

(२) उपरोक्त ५२ योजनावर माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर रुपये २४९.६८ कोटी निधी खर्च झाला आहे. अद्यप रुपये २३५.२० कोटी निधीची आवश्यकता आहे.
(३) निधी उपलब्धतेनुसार योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## बुलडाणा जिल्हयातील महात्मा फुले जलसंधारण योजनेतील धरणातील व शेत तळ्यातील गाळ काढण्याचे अनुदान दिले नसल्याबाबत

**(४९) १६०२१ (०९-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील महात्मा फुले जलसंधारण योजनेतील सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षातील धरणातील व शेत तळ्यातील गाळ काढण्याचे अनुदान अद्यापपर्यंत कृषी विभागाकडून दिले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात शेतकऱ्यांना केसापूर, खंडाळा, मकरध्वज, पाटोदा, भोरसा भोरसी, महिमळ इत्यादी धरणातून व शेत तळ्यातील गाळ काढण्याचे अनुदान न मिळाल्यामुळे तालुका अध्यक्ष कॉग्रेस कमिटी चिखली यांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१३ रोजी शासनाकडे निवेदन दिलेले आहे व त्यानंतरही वेळोवेळी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना गाळ काढण्याचे अनुदान शासनाकडून न मिळाल्यामुळे शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कुठलीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०७-२०१५) :**(१) नाही. सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये बुलडाणा जिल्ह्यास एकूण रु. २५३.८९ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधी पूर्णत: खर्च करण्यात आला आहे.
(२) होय.
(३) व (४) निधी नसताना व मान्यता नसताना अतिरिक्त कामे करण्यात आली. या झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.

---

**वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील मौजे वांगणी, निगडे व पाबे या डोंगरी भागात लघुपाटबंधारे तलावांचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(५०) १६१०२ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील मौजे वांगणी, निगडे व पाबे या डोंगरी भागात लघुपाटबंधारे तलावांचे सर्वेक्षण करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी दिनांक १९ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, येरवडा, पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०८-२०१५) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

वेल्हे तालुक्यातीलमौजे वांगणी व निगडे बु.गावात लघु पाटबंधारे तलावांचे सर्वेक्षणाबाबत मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त आहे. तथापि, सदर निवेदनामध्ये पाबे या गावाचा उल्लेख नाही.

(२) मौजे वांगणी, निगडे बु (ता.वेल्हे) येथे क्षेत्रिय पाहणीअंती लघु पाटंबधारे तलावासाठी साईअ उपलब्ध नसल्याचे दिूसन आले. त्यामुळे वांगणी गावाचे परिसरात ४ पाझर तलावाचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून अंदाजपत्रके तयार करण्याचे काम वांगणी (सामनदरा), वांगणी (कमळदरा), वांगणी (श्रीपती पाटील दरा) व वांगणी (मंदिराजवळ) या उपविभागात प्रगतीपथावर आहे.

तथापि सदर कामासाठी आवश्यक जमीन मालकांची संमतीपत्रे अद्याप अप्राप्त आहेत.

तसेच जलयुक्त शिवार अभियानांतर्गत वांगणी येथे २ सिमेंट नाला बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत त्याबाबतची निविदा प्रक्रिया चालू असून कामे लवकरच सुरु करण्यात येत आहेत.

मौजे निगड येथे जिल्हा परिषदेचा पुर्वीचा एक पाझर तलाव अस्तित्वात असून या ठिकाणी पाझर तलावास योग्य साईट उपलब्ध नाही.

मौजे पाबे या गावात सद्य:स्थितीत कोणतीही योजना प्रस्तावित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.